महाराष्ट्र शासन

क्र. प्रआयो-२०१८/प्र.क्र. २५६/यो-१०,
ग्राम विकास विभाग,
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई-४०० ००१
दि. २४ डिसेंबर, २०१८.

प्रति,
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद (सर्व).

विषय:- ग्रामीण भागातील शासकीय जमिनीवरील निवासी प्रयोजनार्थ केलेली अतिक्रमणे नियमानुकूल करावयाच्या धोरणांतर्गत संगणकीय प्रणालीवरील नोंदीबाबत करावयाची कार्यवाही.

संदर्भ:- १. शासन निर्णय क्र. प्रआयो-२०१७/प्र.क्र.३४८/योजना-१०, दि. १६.२.२०१८.
२. शासन निर्णय क्र. प्रआयो-२०१८/प्र.क्र. २५६/यो-१०, दि. २०.८.२०१८.
३. शासनाचे सम क्रमांकाचे पत्र दि. ५.११.२०१८ .
४. शासनाचे सम क्रमांकाचे पत्र दि. १९.११.२०१८.

ग्रामीण भागातील शासकीय जमिनीवरील निवासी प्रयोजनार्थ केलेली अतिक्रमणे नियमानुकूल करण्याबाबत संदर्भाधिन शासन निर्णय व परिपत्रकान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. आतापर्यंत संगणक प्रणालीवर ४,६५,७५५ अतिक्रमणांची नोंद झालेली असून त्यापैकी ३,५०,०७७ अतिक्रमणे ही दि. १.१.२०११ पूर्वीची असल्याबाबत संगणक प्रणालीमध्ये नोंद झालेली आहे. अतिक्रमण नोंदीबाबत आक्षेप/सूचना मागविण्यात आलेल्या असून दि. १.१.२०११ पूर्वीच्या अतिक्रमणाबाबत स्थळ पाहणी (Spot Verification) करुन माहिती व फोटो अपलोड करण्यासाठी मोबाईल ॲप ग्रामसेवक लॉगिन मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. दि. २४.१२.२०१८ रोजीच्या अहवालानुसार केवळ ७७,८६९ अतिक्रमणाची माहिती मोबईल ॲप वर अपलोड झालेली असल्याचे निदर्शनास आलेले आहे. अतिक्रमण नियमानुकूल करण्याची कार्यवाही मर्यादित कालावधीत पूर्ण होण्यासाठी पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१. उपरोक्त संदर्भिय पत्र क्र. ४ अन्वये "परिशिष्ट क" प्रमाणे अतिक्रमणाची स्थळ पाहणीबाबत सूचना दिलेल्या आहेत. सदरची स्थळ पाहणी (Spot Verification) करिता यापूर्वीच मोबाईल ॲप उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. ग्रामसेवक लॉगिन मधून मोबाईल ॲप मध्ये अतिक्रमण धारकांची माहिती व फोटो अपलोड करावयाचे आहेत. सदर मोबाईल ॲप मध्ये दि. १.१.२०११ पूर्वीच्या अतिक्रमण धारकांची नावे उपलब्ध होणार असल्याने दि. २९.१२.२०१८ पर्यंत त्याची माहिती मोबाईल ॲपमध्ये भरुन पूर्ण करण्यात यावी.

Scanned by CamScanner

२. संगणक प्रणालीवरुन ज्या अतिक्रमणाबाबत आक्षेप व सूचना प्राप्त झाल्या आहेत अशी यादी व ज्या अतिक्रमणाबाबत आक्षेप व सूचना प्राप्त नाहीत अशा दोन वेगळया याद्या तयार करण्यात याव्यात.

३. ज्या अतिक्रमणांबाबत आक्षेप व सूचना प्राप्त झालेल्या नाहीत आणि सदर अतिक्रमणांची मोबाईल ॲपद्वारे प्रत्यक्ष स्थळ पाहणी अहवालानुसार असलेली माहिती उदा . सर्व्हे/ मिळकत क्रमांक, अतिक्रमण क्षेत्र, अतिक्रमणधारकाचे नांव इ. हे संगणक प्रणालीवर नोंद केलेल्या "परिशिष्ट अ " (गाव नमुना ८) प्रमाणे बरोबर असल्यास अशी अतिक्रमणे नियमानुकूल करण्याबाबत अंतिम निर्णय घेणेसाठी ग्रामपंचायत मासिक सभा व विशेष ग्रामसभेपुढे सदर प्रस्ताव ठेवण्यात यावा.

४. ज्या अतिक्रमणांबाबत आक्षेप व सूचना प्राप्त झालेल्या आहेत तसेच ज्या अतिक्रमणांची मोबाईल ॲपद्वारे प्रत्यक्ष स्थळ पाहणी अहवालानुसार असलेली माहिती उदा . सर्व्हे /मिळकत क्रमांक, अतिक्रमण क्षेत्र, अतिक्रमणधारकाचे नांव इ. आणि हे संगणक प्रणालीवर नोंद केलेल्या "परिशिष्ट अ " (गाव नमुना ८) मध्ये तफावत असल्यास अशा अतिक्रमणांबाबत अंतिम निर्णय घेणेसाठी ग्रामपंचायत मासिक सभा व विशेष ग्राम सभेमार्फत उपविभागीय अधिकारी यांचे अध्यक्षतेखालील गठित केलेल्या प्रदत्त समितीकडे असे प्रस्ताव पाठविण्यात यावेत.

५. उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करण्यासाठी ग्रामपंचायतीची मासिक सभा व विशेष ग्रामसभेचे आयोजन दि.११.१.२०१९ पूर्वी करण्यात यावे.

६. ज्या ग्रामपंचायत कार्यक्षेत्रात एकाही अतिक्रमणाची नोंद संगणक प्रणालीमध्ये झालेली नाही त्या ग्रामपंचायतींनी त्यांच्या क्षेत्रात "एकही अतिक्रमण नाही" असे प्रमाणपत्र मासिक सभेत व विशेष ग्रामसभेत मंजूरी घेऊन दि. ११.१.२०१९ पूर्वी संबंधित पंचायत समितीच्या गट विकास अधिकारी यांना सादर करावे.

७. अतिक्रमण नियमानुकुल करणेबाबतचे ग्राम विकास विभागाकडील उपरोक्त संदर्भिय शासन निर्णय व परिपत्रकामध्ये दिलेल्या सूचनाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात यावी.

आपला,

(वि. द. शिंदे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-
१. संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, बेलापूर, नवी मुंबई.
२. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), जिल्हा परिषद (सर्व).
३. प्रोजेक्ट मॅनेजर सीएससी एसपीव्ही, ई-गव्हर्नन्स इंडिया प्रा. लि.

Scanned by CamScanner